ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

‘अर्थ एव प्रधान:’’ इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख २६ ऑगस्ट, १९५३ अंक ३४

## विविध माहिती

**काथ्याच्या मालाची निर्यात**—भारतामधून निर्यात होणारा काथ्या आणि त्याचा माल ह्यांत १९५१ सालापेक्षा १९५२ सालीं घट झाल्याचें समजतें. १९५२ मध्यें ३६ टक्के कमी किंमतीचा माल निर्यात झाला. १९५१ सालीं १३.५ लाख हंड्रेडवेट काथ्या निर्यात झाला होता. १९५२ सालीं १२.२ लाख हंड्रेडवेट काथ्या निर्यात झाला.

**बांगडीचे कारखाने बंद**—डहाणूजवळील चिंचणी आणि तारापूर येथील १७ बांगडीच्या कारखान्यांपैकीं १५ कारखाने बंद पडल्यामुळें शेंकडों कामगार बेकार झाले आहेत. ह्या धंद्यावर मंदीचा परिणाम झालाच आहे, पण प्लॅस्टिकच्या बांगड्या घालण्याचा प्रघात पडूं लागल्यामुळेंहि कांचेच्या बांगड्यांना मागणी कमी येऊं लागली आहे.

**वाघाची बच्ची सिनेनट झाली**—लखनौ येथील प्राणिसंग्रहालयांत “विंध्य वनी” नांवाची वाघाची बच्ची आहे. ह्या नटीला आतां सिनेमांत काम करण्यासाठी मागण्या येऊं लागल्या आहेत. आतापर्यंत तिनें प्राणिसंग्रहालयाला २,००० रुपये मिळवून दिले आहेत. बंगलोरमध्यें १४ दिवस काम करण्याबद्दल तिला १,००० रुपये मिळाले. १४ दिवसांत शूटिंग पुरें न झाल्यामुळें आणखी १,००० रुपये देऊन आणखी १४ दिवसांसाठी तिला बंगलोरला नेण्यांत आलें आहे.

**रशिआला भारताचा चहा पाहिजे**—रशिआ भारताकडून ऐनजिनसी देवघेवीच्या तत्त्वावर चहा घेण्यासाठी विचारणा करीत आहे, असें समजतें. ह्या करार झाला तर आसाममधील चहाला बाजारपेठेची वाण भासणार नाहीं, अगर चहाच्या भरमसाठ उत्पादनाचीहि भीति उरणार नाहीं, असें आसामचे मुख्य मंत्री श्री. विष्णुराम मेधी ह्यांनीं सांगितलें.

**सरकार जमीन ताब्यांत घेणार**—अहमदाबादच्या जिल्हाधिकाऱ्यांनीं कांहीं जमीन-मालकांना नोटिसा दिल्या असून, चालू पेरणीच्या हंगामांत त्यांनीं आपल्या जमिनी लागवडीस न आणल्यास त्या सरकार आपल्या ताब्यांत घेईल असें कळविलें आहे. एकूण १२,००० एकर जमिनीबाबत अशा नोटिसा देण्यांत आल्या आहेत.

**जपानची पाकिस्तानला उधारी**—पाकिस्तानच्या शेतीचा विकास घडवून आणण्यास मदत म्हणून जपानच्या सरकारनें ५० कोटी पौंडांचा माल उधार देण्याची तयारी दाखविली आहे. ह्या उधारीचा उपयोग करून पाकिस्तान जपानकडून शेतीची यंत्रसामुग्री आणणार आहे. सर्व व्यवहार जपान इंपोर्ट-एक्सपोर्ट बँकेमार्फत व्हावयाचा आहे.

**धंदेशिक्षणाची संस्था**—मध्य भारतांत धंदेशिक्षण देणारी एक संस्था उघडण्याचें भारतीय सरकारनें मान्य केलें आहे. मध्य भारताचे मजूर मंत्री श्री. द्रवीड ह्यांनीं अशा प्रकारच्या संस्थेची आवश्यकता भारतीय सरकारच्या मजूर मंत्र्यांच्या निदर्शनाला आणली होती.

**अमेरिकेंतील वाचनालयें**—शाळा, कॉलेजें आणि संशोधन संस्था ह्यांमधील विद्यार्थ्यांच्या उपयोगास येणारीं अमेरिकेंत एकूण १,००,००० पेक्षा अधिक ग्रंथालयें आहेत. त्याशिवाय सर्वसामान्य नागरिकांना उपयुक्त ठरणारीं अशीं ९,१०० ग्रंथालयें आहेत, तीं वेगळींच.

**नेताजींचें घर ओरिसा सरकार विकत घेणार**—कटकमध्यें असलेलें जानकीनाथ भवन हें घर ओरिसाचें सरकार शरच्चंद्र बोस ह्यांच्या वारसाकडून विकत घेणार आहे. ह्याच घरांत सुभाषचंद्र बोस ह्यांचा जन्म झाला होता. नेताजी सेवासदन ह्या संस्थेनें काढलेल्या इस्पितळाला हें घर देण्याचा सरकारचा विचार आहे.

**जर्मनीच्या मदतीनें पोलादाचा कारखाना**—भारत सरकार पोलादाचा एक नवा कारखाना काढण्याच्या विचारांत असून त्यासंबंधीं एका जर्मन कंपनीशीं वाटाघाटी चालू आहेत. कारखान्याची जागा अद्याप निश्चित झालेली नाहीं. जर्मन कारखानदार ह्या नव्या कारखान्यांत तांत्रिक आणि आर्थिक भाग घेणार आहेत. त्यांच्याच सल्ल्यानें कारखान्याची जागा मुक्रर करण्यांत येणार आहे.

**कोरिआंतील युद्ध कायमचें थांबलें तर**—कोरिआंतील युद्ध कायमचें थांबलें तर अमेरिका आपल्या आरमारापैकीं निम्में आरमार भूमध्यसमुद्रांत पाठवील अशी वार्ता आहे.

**मास्कोमधील भारतीय कला-प्रदर्शन**—मास्को येथें भरविण्यांत आलेलें भारतीय कला-प्रदर्शन बरेंच लोकप्रिय झाल्याचें समजतें. श्री. चौधरी, श्री. भूषण, श्री. वनालिआ आणि श्री. भट्टाचार्य ह्यांच्या कलाकृति विशेष यशस्वी झाल्या अशी वार्ता आहे.

**योजनांना मदत**—उत्तर प्रदेशांत ज्या ठिकाणाचे लोक स्वत: कष्ट करून अगर पैसे उभारून विकास-योजना अंमलांत आणण्यास तयार असतील, त्या लोकांना मदत करण्यासाठीं राज्य सरकारनें ५८ लाख रुपयांची रक्कम राज्याच्या नियोजन खात्याच्या स्वाधीन केली आहे. कोणत्याहि योजनेचा दोनतृतीयांश खर्च त्या भागांतील लोकांनीं सोसल्यास उरलेला एक तृतीयांश खर्च वरील रकमेंतून मिळणार आहे.

## बँकेच्या सेवेबद्दल ग्राहकांकडे विचारणा

### दि पूना इन्व्हेस्टर्स बँकेचा उपक्रम

दि पूना इन्व्हेस्टर्स बँक लि. नें आपल्या चेकवर आंकड्यांचा तक्ता छापून, त्यावरील योग्य त्या आंकड्यास टोचानें भोक पाडावयाची योजना तयार करून अमलांत आणली. त्याची माहिती आम्हीं "अर्थ"च्या ८ जुलैच्या अंकांत दिली होती. त्यावरून अनेक बँकांनीं पूना इन्व्हेस्टर्स बँकेचे मॅ. डायरेक्टर श्री. भाऊसाहेब साळवेकर ह्यांचेशीं समक्ष व पत्रद्वारें चर्चा व विचारविनिमय केला. बँकेच्या ग्राहकांची सोय पहाण्याच्या नव्या नव्या कल्पना श्री. साळवेकर अंमलांत आणीत आहेत. बँकेनें तिच्या ग्राहकांना पाठविलेल्या पत्राचा उतारा खालीं दिला आहे, तो इतर बँकांनाहि मार्गदर्शक होण्याजोगा आहे.

---

स. न. वि. वि.

आपण आपलें खातें या बँकेंत उघडून वाढीस हातभार लावलात ह्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोंत.

मुख्यतः हें पत्र आपणांकडे पाठविण्याचें कारण आम्हीं आपणांस देत असलेली सेवा कोणत्या दृष्टीनें कमी पडत आहे हें कळावें व त्यांत योग्य त्या सुधारणा आम्ही कराव्या; व जर आमचेकडून होत असलेली सेवा बरोबर होत असेल तर आपण निदान आपल्या एका स्नेह्यास या बँकेंत खातें उघडण्यास लावावें, अशी नम्र विनंति आहे.

कळावें, लोभाची वृद्धि व्हावी.

आपला विश्वासू,

( सही ) के. बी. साळवेकर

मॅनेजिंग डायरेक्टर.

खालील प्रश्नांचीं उत्तरें यावीत अशी विनंति आहे.

( १ ) पैसे देतांना व घेतांना वेळ लागतो का ?

( २ ) आपणांस खातें-उतारा मिळण्यास वेळ लागतो का ?

( ३ ) बँकेंतील नोकरवर्ग आपणांस सेवा देण्यास हयगय करतात काय ?

( ४ ) येथील बिलांचे बाबतींत कांहीं गैरसोय होते का ?

( ५ ) परगांवच्या भरलेल्या बिलाबद्दल आपली तक्रार आहे काय ? असल्यास काय ?

याशिवाय आपण जरूर त्या सूचना कराव्यात.

---

### सर जे. प. मदन ह्यांची धुळयास भेट

मुंबई प्रॉव्हिन्शियल को. इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष, सर जे. प. मदन, आय्. सी. एस. हे धुळें येथें नुकतेच येऊन गेले. सदर मुक्कामांत त्यांनीं प्रॉ. को. बँक, धुळें, डिस्ट्रिक्ट को. बोर्ड धुळें व प. खा. लॅन्ड मॉर्गेज बँक, धुळें या संस्थांना भेटी दिल्या व उपयुक्त व बहुमोल सूचना कार्यकर्त्यांना केल्या. शेतकऱ्यांना विहिरी बांधणें, ताली घालणें, वगैरे कामाकरितां कर्ज देण्याबाबत त्यांनीं भर दिला, तसेंच यंदा हंगाम बरा असल्यानें वसुलीबाबत लॅन्ड मॉर्गेज बँकेच्या कार्यकर्त्यांना त्यांनीं आदेश दिला. डिस्ट्रिक्ट को. बोर्डास भेट देऊन कामकाजाबाबत त्यांनीं समाधान व्यक्त केलें. जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांना सहकारी शिक्षण देणें किती महत्त्वाचें आहे हें सांगून सहकारी कायद्याप्रमाणें सोसायट्यांनीं शिक्षण फंड बोर्डास देण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली. वसुलीबाबत महाशय कलेक्टरसाहेब यांच्याशींहि त्यांनीं विचारविनिमय केला. प्रॉ. बँक धुळें, राजवाडे मंडळ, राजवाडे अर्बन बँक, या संस्थांनाहि त्यांनीं ओझरती भेट दिली.

### बर्लिन प्रदर्शनांत भारत भाग घेणार

बर्लिन येथें ता. २८ सप्टेंबर पासून ११ ऑक्टोबर पर्यंत एक औद्योगिक प्रदर्शन भरणार आहे. प्रदर्शनांत भारतीय सरकार माल मांडणार आहे असें समजतें. माल मांडण्यासाठीं भारत सरकार एक स्वतंत्र तात्पुरती इमारतच बांधणार आहे. भारतांत तयार होणारा विविध प्रकारचा माल प्रदर्शनांत ठेवला जाईल. त्या मालांत, रेशमाचे कपडे, साड्या, पायतणें, हस्तिदंताच्या वस्तू, चहा, तंबाखू, काथ्याचे जिन्नस, कातड्याचें सामान, कलाविषयक वस्तू, कशिद्याचीं कामें, खेळण्याचें सामान, इत्यादि माल राहील. भारताशीं व्यापार वाढविण्याची इच्छा ज्या लोकांना असेल त्यांना योग्य ती माहिती ताबडतोब पुरविण्यासाठीं इमारतींतच एक माहितीचें केंद्रहि उघडण्यांत येणार आहे. ह्या केंद्रांत पृच्छकांना लागेल ती माहिती अगदीं थोड्या वेळांत पुरविण्याची खास व्यवस्था केली जाईल. भारतामधील बऱ्याच प्रमुख उद्योगधंद्यांचे प्रतिनिधी प्रदर्शनाला भेट देतील आणि जर्मनीशीं व्यापार वाढविण्याची शक्यता अजमावून पहातील असा अंदाज करण्यांत येत आहे. भारत प्रदर्शनांत भाग घेणार आहे हें कळल्यावर बर्लिन चेंबर ऑफ कॉमर्सचा एक प्रवक्ता म्हणाला, " ही बातमी फारच चांगली आहे. तुमच्या देशाचा माल पहाण्यास आम्ही उत्सुक झालों आहोंत. ह्या प्रदर्शनाच्या निमित्तानें भारत आणि जर्मनी ह्यांच्यामधील व्यापारवृद्धीला मदत होईल अशी आमची अपेक्षा आहे. भारत व जर्मनी ह्यांच्यांतील व्यापार वाढेल आणि त्याची भरभराट होईल अशी आशा आम्हीं बाळगतों. " युद्धोत्तर कालांत जर्मनीनें आपले उद्योगधंदे पुन्हा उभारले असून त्यांचा फायदा भारतीय उद्योगपतींना घेतां येईल, अशी परिस्थिति पुन्हा उत्पन्न झाली आहे.

---

### फ्रान्सकडून भांडवली माल मिळण्याची शक्यता

मद्रास येथील हिंदुस्थान चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष श्री. डी. सी. कोठारी ह्यांनीं भारताच्या औद्योगिक विकासाविषयीं आपले विचार एका अहवालांत व्यक्त केले आहेत. फ्रान्स भारताला बराच भांडवली माल पुरवूं शकेल असें सांगून ते पुढें म्हणतात, कीं भारताकडून फ्रान्सला ताग, कापूस, तेलें, अभ्रक, लाख, मसाल्याचें सामान, चहा, कातडी व चामडी असा अनेक प्रकारचा माल पाहिजे आहे. उलटपक्षीं, फ्रान्स भारताला लोखंड व पोलादाचें सामान, रेल्वेचे रूळ, स्टेनलेस स्टील, कॉस्टिक सोडा, रंगाचें साहित्य, औषधें इत्यादि माल पुरवूं शकेल. सध्या भारत आपला औद्योगिक विकास साधण्याच्या प्रयत्नांत आहे. अशा वेळीं फ्रान्सकडून भारताला भांडवली स्वरूपाचा माल आणि तांत्रिक ज्ञानहि मिळण्याची शक्यता आहे. कारण, गेल्या महायुद्धानंतरच्या कालांत फ्रान्सनें आपले उद्योगधंदे पुन्हा उभारले असून औद्योगिक उत्पादनाच्या बाबतींत युद्धपूर्वकालाच्याहि पुढें मजल मारली आहे. नॉर्वेसारख्या देशानें आपली कापडाची बरीच मोठी गरज प. युरोपांतून कापड मागवून भागविली. ही गोष्ट लक्षांत घेतां नॉर्वेला भारतीय कापड पाठविण्याची शक्यता सहजच लक्षांत येते. नॉर्वेकडून भारताला कागदाच्या धंद्याला लागणारें साहित्य मिळूं शकेल. खतें, रसायनें, इत्यादि पदार्थहि नॉर्वेकडून मिळूं शकतील. नॉर्वेकडून ह्या पदार्थांची आयात केली तर भारताच्या डॉलरच्या गंगाजळींत बचत होईल. फ्रान्समधील अस्थिर आर्थिक परिस्थिति आणि वारंवार बदलणारीं सरकारें ह्या दोन गोष्टींवरून फ्रान्सच्या औद्योगिक पुनर्घटनेविषयीं सहजच शंका वाटते. पण श्री. कोठारी ह्यांच्या अहवालावरून खरी परिस्थिति लक्षांत घेण्यास मदत होते, हें निश्चित.

# अर्थ

बुधवार, ता. २६ ऑगस्ट, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकेच्या अधिकाऱ्यांसाठी कॉलेज

इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सची वार्षिक सभा मुंबई येथें दि. २० रोजीं भरली होती. त्यावेळीं अध्यक्ष, श्री. रामराव, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, ह्यांनीं बँकांच्या अधिकाऱ्यांसाठी एक स्टाफ ट्रेनिंग कॉलेज काढण्यांत येणार आहे त्याच्या योजनेचा उल्लेख केला. ग्रेटब्रिटन, ऑस्ट्रेलिया, इत्यादि देशांतील संस्थांच्या पद्धतीचें हें कॉलेज होईल व त्यांत बँकांच्या वरिष्ठ नोकरांना फॉर्म, कागदपत्रें, रजिस्टरें, इत्यादींच्या साहाय्यानें बँकिंगच्या व्यवहाराचें शिक्षण दिलें जाईल. ह्या कॉलेजाच्या उद्दिष्टास अनुसरून रिझर्व्ह बँक त्यांतील अभ्यासाची आखणी करीलच. ग्रेटब्रिटनमधील मिडलंड बँकेनें स्वतःच्या वरिष्ठ नोकरांसाठी स्वतःचें एक कॉलेज चालविलें आहे, त्याची माहिती येथें बोधप्रद होईल.

ज्यांना शिक्षण द्यावयाचें, त्यांच्या रहाण्याचीहि सोय एकत्र असावयास पाहिजे, हें ठरवून बँकेनें १९४८ सालीं सरे परगण्यांत एक मोठें घर विकत घेतलें. त्यांत कॉलेजाची, त्याच्या कायम शिक्षकांची व ३० विद्यार्थ्यांची सोय करण्यांत आली. रहाण्याची व्यवस्था केवळ सोईचीच नसून, सुखावहहि करण्यांत आलेली आहे. ज्या वयाचे व दर्जाचे लोक बँकेच्या ह्या कॉलेजांत शिक्षणासाठी निवडण्यांत येतात, त्यांना शिस्तीच्या बरोबर सौख्यहि लाभणें आवश्यक असतें. १० दिवसांचा एक अभ्यासक्रम मॅनेजरांसाठी असून, दुसरा ७ आठवड्यांचा कार्यक्रम जे अजून मॅनेजरच्या हुद्यापर्यंत पोंचलेले नाहींत, अशा वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी असतो, व त्यांचें वय साधारणतः ३० ते ४५ वर्षें असतें. ज्यांचा अनुभव, ज्ञान व नोकरींतील हुशारी ही बढती देण्यास योग्य असतील, व ज्यांना कॉलेजांतील विशेष शिक्षणाचा उपयोग होईल अशाच निवडक व मोजक्या लोकांना कॉलेजांत प्रवेश दिला जातो. अनुभवी ब्रँच–मॅनेजरांना पडणाऱ्या व्यावहारिक कामाला कॉलेजांत उजळा दिला जातो; त्याबरोबरच बँकेच्या कारभाराची पुनः तपशीलवार माहिती करून दिली जाते. बहुतेक उमेदवारांनीं इन्स्टिटयूट ऑफ बँकर्सच्या व्यावसायिक परीक्षेसारखी परीक्षा अगोदरच दिलेली असते, त्यामुळें कॉलेजांतील शिक्षणामधील तत्त्व व व्यवहार ह्यांचा मेळ ते घालूं शकतात. कर्जें देण्याचीं तत्त्वें; पत तपासण्याची पद्धति; तारण, परदेशी हुंडणावळ, कंपनी–कायदा व कर ह्याविषयक कायद्यांच्या तरतुदी; कंपन्या गुंडाळण्याबद्दलचा व त्यांच्या दिवाळखोरीबद्दलचा कायदा; बँकर–गिऱ्हाईक नात्याचीं सर्व अंगें; नोकरांशीं संबंध, इत्यादि विषय कॉलेजच्या अभ्यासक्रमांत असतात. २८ उमेदवारांचे चार गट पाडण्यांत येतात; प्रत्येक गटाचें काम स्वतंत्र खोल्यांतून चालतें. बँकिंगविषयक तंत्रें ह्यावरील व्याख्यानें मध्यवर्ती खोलींत होतात. ब्रँच–बँकिंगविषयक गोष्टींचे व्यावहारिक स्वरूपाचे प्रश्न सोडविण्याचा उपक्रम उमेदवारांना फार उपयुक्त होतो. त्यांच्या ज्ञानांतील तुटलेले दुवे ते दुरुस्त करून घेऊं शकतात. घरगुती उपाधींपासून स्वतंत्र व व्यवसायबंधूंबरोबर एकत्र राहिल्यानें, त्यांचें अभ्यासाकडे लक्ष चांगलें लागतें व इतर ठिकाणांहून आलेल्या उमेदवारांशीं घसट झाल्यानेंहि ज्ञानांत व अनुभवांत भर पडते. ते एकमेकांशीं त्यांच्या स्थानिक अडचणी व वैशिष्ट्यें सांगतात. त्याचा त्यांना व पर्यायानें बँकेसहि फायदा होतो. मुख्य कचेरीचे अधिकारी व इतर तज्ज्ञ हे त्यांच्या विषयांवर अधिकारी वाणीनें माहिती सांगतात व त्यांच्याशीं जेवणाचे वेळीं, कॉमनरूममध्यें, किंवा बागेंत, बोलण्याचालण्यांत उमेदवारांचा प्रत्यक्ष संबंध येतो, तोहि उत्साहवर्धक असतो. शिक्षणक्रम चालू असतांना किंवा त्याचे अखेरीस कोणतीहि परीक्षा अशी घेतली जात नाहीं. परंतु, उमेदवारांचें ज्ञान, लायकी, वागण्याची पद्धति, व्यक्तित्व, ह्यांची नोंद झाल्याविना रहात नाहीं.

मॅनेजरांचा अभ्यासक्रम वेगळ्या धर्तीवर आखण्यांत येतो. त्यांच्या शिक्षणावर भर देण्यांत येत नाहीं; रोजच्या व्यवहारांत ज्या प्रमुख अधिकाऱ्यांशीं व्यवहार पडतो, त्यांचेशीं घनिष्ठ संबंध निर्माण करण्यास हा वर्ग उपयोगी पडतो. ह्या वर्गासाठी तेथेंच रहाणारे शिक्षक नियुक्त केलेले नसतात; मुख्य कचेरीचे अधिकारी भेटी देऊन चर्चा करतात, आणि त्यांना महत्त्वाची अशी माहिती देतात. बँकेचें व्यापक धोरण व हितसंबंध ह्यांचे दृष्टिकोनांतून शाखेच्या कामाकडे बघण्याचें मौल्यवान शिक्षण शाखा–मॅनेजरांना ह्या ठिकाणीं मिळतें.

मिडलंड बँकेची ही योजना गेलीं पांच वर्षें अंमलांत आहे, आणि तिची मूळ अपेक्षा बऱ्हंशीं फलद्रूप झाली आहे, असा बँकेस अनुभव आलेला आहे. ज्यांना ह्या कॉलेजांतील अभ्यासक्रमापासून फायदा मिळण्याजोगा आहे, अशांची निवड होऊन त्यांना कॉलेजांत प्रवेश मिळाला पाहिजे; म्हणजेच कॉलेजाची उपयुक्तता वाढेल हें उघड आहे. रिझर्व्ह बँकेची योजना कोणत्या दर्जाच्या बँकमॅनेजरांसाठी, अधिकाऱ्यांसाठी किंवा नोकरांसाठी आहे हें अद्याप स्पष्ट झालेलें नाहीं. वरिष्ठ नोकरांसाठी मिडलंड बँकेचें कॉलेज काय करतें, हें तोंवर पहाणें उद्बोधक होईल. व्यावहारिक व्यवसायांत गुंतलेल्या बँकर्सना अशा कॉलेजांत प्रत्यक्ष शिक्षणाचें व माहिती पुरविण्याचें काम किती चांगल्या तऱ्हेनें करतां येईल, ह्यावर योजनेचें खरें यश बऱ्याच अंशीं अवलंबून राहील हें उघड आहे.

## कसोटीचा सामना हरले, तरी १,००,००० पौंडांचा नफा

ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट संघास त्याच्या इंग्लंडमधील दौऱ्यांत ९०,००० ते १,००,००० पौंड नफा राहील, असा अंदाज आहे. पांच कसोटींच्या सामन्यांतील नफ्याचा त्यांचा वाटा ५५,००० पौंड होईल. कसोटींच्या बहुतेक सामन्यांत पावसानें व्यत्यय आणला तरी ५,००,००० लोकांनीं ते पहाण्यासाठी २,००,००० पौंड खर्च केले. लॉर्ड्स मैदानावरील कसोटीच्या सामन्याचें उत्पन्न ५७,००० पौंड झालें. त्याच्या अगदी नजीकचा उत्पन्नाचा आकडा मेलबर्न येथील १९४६–४७ मधील एम. सी. सी. च्या दौऱ्यांतील सामन्याचा आहे. त्यावेळीं ४४,०६३ पौंड उत्पन्न झालें होतें.

## निरक्षर विमेदाराची सही त्यावेवर केव्हां बंधनकारक होईल ?

### विमा-कंपनीविरुद्ध हायकोर्टाचा निवाडा

सुबय्या चेट्टियन ह्यांनीं ओरिएंटल विमाकंपनींत ५०,००० रु. ची, २० वर्षे मुदतीची नफ्यासहित विम्याची पॉलिसी २७ एप्रिल १९४५ रोजीं घेतली होती. त्यांनीं दोन हप्ते भरले व ते १९४६ मध्यें मृत्यु पावले. त्यांच्या विधवेच्या नांवानें पॉलिसी असाइन केलेली होती. विमाकंपनीनें विम्याचे पैसे देण्याचें नाकारलें. तिच्या मतें, विम्याच्या प्रपोजल फॉर्मवरील कांहीं प्रश्नांचीं व कंपनीच्या डॉक्टराच्या प्रश्नांचीं विमेदारानें खोटीं व चुकीचीं उत्तरें दिलीं होतीं. दावा चालविणाऱ्या कोर्टानें कंपनीच्या बाजूनें निवाडा केला, त्यावरील अपील मद्रास हायकोर्टानें फेटाळून विम्याचे पैसे देवविले. "निरक्षर माणसांच्या बाबतींत, जो मनुष्य त्यांना फॉर्म समजावून सांगतो व त्यांतील प्रश्नांचीं उत्तरें लिहून घेतो, त्याचा जबाब घेतला जाणें आवश्यक आहे; त्याच्या अभावीं, निरक्षर माणसाची सही किंवा आंगठा ह्यावरून केवळ तो फॉर्म त्यावर बंधनकारक केला जातां कामा नये. इंग्रजींत टाइप केलेलीं उत्तरें विमेदारानें स्वतःच लिहिलीं, हें गृहीत धरून दाव्याचा निवाडा करणें चुकीचें होईल."

---

### भारतीय रेल्वे शताब्दी प्रदर्शन गाडी

वरील गाडीचा मुक्काम पुणें येथें २८ ऑगस्ट अखेर आहे. ह्या गाडींत ठेवलेले नमुने भारतीय रेल्वेजच्या प्रचंड कार्याची कल्पना करून देण्यास पुरेसे आहेत. रेल्वेबोर्ड, उत्तर रेल्वे, दक्षिण रेल्वे, पूर्व रेल्वे, मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे, उत्तर-पूर्व रेल्वे, ह्यांनीं व कांहीं सरकारी खात्यांनीं व व्यापारी फर्म्सनीं नमुने गाडींत मांडले आहेत. मध्य रेल्वेनें ठेवलेल्या नमुन्यांत औरंगाबाद हॉटेल, बोर घाटांतील बोगद्यांत सांपडलेलीं रत्नें, वहातुक चालू असतांना बोगदा रुंद करणें, गोदींत इंजिन उतरविणें, स्वयंचलित टेलिफोन एक्सचेंज, कोड रिंगिंग उपकरणें, पॉवर सिग्नलिंग आणि भुसावळ विद्युतगृह ह्यांचे नमुने आहेत. पंचवार्षिक योजनेच्या प्रचारासाठीं फिरत्या गाडीचा उपयोग करून घेण्यांत आला असून, योजनेंतील उद्दिष्टें व योजनेची प्रगति नमुन्यांच्या, आंकड्यांच्या व चित्रांच्या साहाय्यानें दाखविण्यांत आली आहे. सामान्य माणसाला सरकारच्या विरुद्ध नेहमीं टीका ऐकावयास व वाचण्यास मिळते; प्रस्तुत प्रदर्शनगाडीच्या निरीक्षणामुळें त्यास सरकार काय काय करीत आहे हें समजूं शकेल व हिंदी आर्थिक प्रश्नाची भव्यताहि त्याला समजून येईल.

---

### मा. नलावडे ह्यांचा मर्चंटस बँकेतर्फे सत्कार

पुणें मर्चंटस को. बँकेचे चेअरमन, श्री. ग. म. नलावडे ह्यांची निवड पुणें नगरपालिकेच्या महापौरपदीं झाली. ह्यानिमित्त त्यांचा सत्कार बँकेच्या सर्व सभासदांचे वतीनें श्री. कॉ. ना. तथा सावकार घाडगे यांचे अध्यक्षतेखालीं रविवार, ता. २३ रोजीं गोखले स्मारक मंदिरांत करण्यांत आला.

---

### पु. सें. को. बँकेच्या इंदापूर शाखेचा रौप्यमहोत्सव

पुणें सें. को. बँकेच्या इंदापूर शाखेचा रौप्यमहोत्सव-समारंभ इंदापूर येथें दि. २३ ऑगस्ट रोजीं मुंबई राज्याचे पुरवठामंत्री, श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या हस्तें झाला.

**ब्रह्मदेश पाकिस्तानचा कापूस घेणार**—ब्रह्मदेश स्वतःला लागणारा कापूस आतांपर्यंत इजिप्तकडून घेत असे. पण आतां प्रथमच पाकिस्तानकडून कापूस घेण्याचें ब्रह्मदेशच्या सरकारनें ठरविलें आहे. पाकिस्तानकडून २,००० गांठी कापूस घेण्याचें ठरलें असून आणखीहि कांहीं गांठी पुढें घेण्यांत येतील असें समजतें.

---


फक्त पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या

### सभासदांकरतां नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. ची ३६ वी वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक १३ सप्टेंबर १९५३ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे असेंब्ली हॉलमध्यें भरणार आहे.

सदर सभेमध्यें खालील कामें करण्यांत येतील.

१ दिनांक २९-३-५३ रोजीं झालेल्या विशेष साधारण सभेचा वृत्तांत कायम करणें.

२ २९-३-५३ च्या विशेष साधारण सभेंत नेमलेल्या उपसमितीनें "निवडणूक पद्धति व नियमासंबंधीं केलेल्या रिपोर्टाचा विचार करणें."

३ दि. ३० जून १९५३ रोजीं संपणाऱ्या सालाबद्दलचा बँकेच्या कामकाजाचा अहवाल व ताळेबंद, नफा वांटणी पत्रकासह मंजूर करणें.

४ बोर्डाच्या निकालाविरुद्ध कोणाच्या तक्रारी असल्यास त्या ऐकून त्यांचा निकाल करणें.

५ सन १९५३-५४ सालाकरितां नेमावयाच्या बँकेच्या हिशेबतपासनिसांचें वेतन ठरविणें.

६ पुढील सालाकरितां बँकेचे डायरेक्टर्स, चेअरमन, व्हाईस चेअरमन निवडणें व हिशेबतपासणीस नेमणें.

७ पोट नियम नं. ५ (भाग भांडवल वाढविणेबद्दल) मध्यें सुचविलेल्या दुरुस्त्यांचा विचार करणें.

८ सभासदांकडून निवडणुकीचे नियम नं. १५ यांत सुचविलेल्या दुरुस्तीचा विचार करणें.

९ सभासदांकडून आलेल्या खालील ठरावांचा विचार करणें.

"ह्या बँकेच्या कोणत्याहि सेवकास बँकेच्या नोकरीच्या निवृत्ती-(रिटायर) नंतर बँकेच्या डायरेक्टर्स-बोर्डाच्या निवडणुकीस दहा वर्षे पावेतों उभें राहतां कामा नये."

१० बोर्डानें सें. बँक नि. नं. ९ यांत दुरुस्ती केली आहे ती पो. नि. नं. ७७ अन्वयें साधारण सभेस दाखल.

११ सभेपुढें आयत्यावेळीं कांहीं कामें असल्यास त्यांचा मा. चेअरमनसाहेब यांचे परवानगीनें विचार करणें.

वार्षिक सभेचे वेळीं सभासदांस कांहीं माहिती विचारावयाची असल्यास त्यांनीं ती दिनांक १ सप्टेंबर १९५३ रोजीं दुपारीं ४ वाजण्यापूर्वीं मुख्य कचेरींत मॅनेजिंग डायरेक्टर यांचेकडे लेखी मागावी.

नवीन सालचे बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या निवडणुकीकरितां व हिशेबतपासनिसांच्या नेमणुकीकरतां मतें देण्याची वेळ दिनांक १३ सप्टेंबर १९५३ रोजीं सकाळीं ८॥ ते दुपारीं १२ वाजेपर्यंत आहे.

सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

पुणें शहर
दिनांक २२ ऑगस्ट १९५३

बोर्डाचे हुकुमावरून
मो. वि. रवडे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## बटाट्याचें खाद्य व औद्योगिक दृष्ट्या महत्त्व

(श्री. वा. कृ. कोगेकर, एल. एजी.)

"अर्थां"च्या ता. ५ आगस्ट, १९५२ च्या अंकांत विविध माहिती च्या सदराखालीं, भारतांत बटाट्याची लागवड किती वर्षांपूर्वी सुरूं झाली यासंबंधीं माहिती दिलेली आहे. बटाटा हा पदार्थ खाद्य व औद्योगिक दृष्टीनेंही फार महत्त्वाचा असल्यामुळें, त्याच्या निरनिराळ्या उपयोगासंबंधीं माहिती उपयुक्त होईल असें वाटल्यावरून खालीं ती थोडक्यांत दिली आहे.

बटाट्याचें पृथःकरण केलें असतां त्यांतील घटक खालीलप्रमाणें समजून येतात. बटाट्यामध्यें ७५ टक्के पाण्याचा भाग असून २१ टक्के पिठूळभाग, ज्यास स्टार्च असें म्हणतात, तो असतो. राहिलेल्या ४ टक्क्यांमध्यें २ टक्के प्रोटीन (नत्रिल) व बाकीच्या २ टक्क्यांमध्यें थोडा स्नेह (फॅट) व बाकी भाग- खनिजद्रव्यें. याप्रमाणें सर्वसाधारणपणें बटाट्याचें अन्नाच्या दृष्टीनें पृथःकरण आहे.

**बटाट्याखालील क्षेत्रः**—आपल्या भारत देशामध्यें बटाट्याची लागवड इतर देशांच्या मानानें फारच थोड्या प्रमाणावर होते. बटाट्याचें पीक थंड हवेंत होणारें असल्यामुळें पाश्चात्य देशामध्यें तें फारच मोठ्या प्रमाणावर केलें जातें. भारतामध्यें बटाट्याखालील क्षेत्र सुमारें ६ लक्ष एकर आहे. जर्मनी, रशिया, अमेरिका या देशांमध्यें बटाट्याची लागवड फारच मोठ्या प्रमाणावर होते. जर्मनीमध्यें बटाट्याखालील क्षेत्र सुमारें ७० लक्ष एकर पर्यंतहि असतें. त्याचप्रमाणें रशिया व नंतर अमेरिका व ब्रिटन असे बटाट्याच्या लागवडीसंबंधानें अनुक्रम लागतात. भारतामधील बटाट्याचें एकंदर वार्षिक उत्पन्न सुमारें १६ लक्ष टन आहे. भारतासारख्या विशाल देशाची लोकसंख्या लक्षांत घेतां हें उत्पन्न फारच कमी असून, सर्वांस बटाटे खाण्यास भरपूर व स्वस्त मिळणेंच मुष्कीलीचें असल्यामुळें येथें औद्योगिक उपयोगाकरितां बटाट्याचा उपयोग करण्याचा प्रश्नच येत नाहीं. परंतु पाश्चात्य देशांमध्यें जेथें क्रोडो टन बटाट्याची निपज होते तेथें त्यांचा उपयोग खाण्याकडे भरपूर होऊन, औद्योगिक धंद्याकडे बऱ्याच मोठ्या प्रमाणावर करावा लागतो. अमेरिकेमध्यें दर माणशीं बटाट्याचें उत्पन्न अदमासे ४ बुशेल म्हणजे सुमारें १६० शेर पडते. त्यापैकीं प्रत्येक मनुष्याचे वार्षिक खाण्यास सुमारें १२० शेर पडतें असा अंदाज काढलेला आहे. वरील प्रमाणावरून बटाट्याचा उपयोग खाण्याच्या कामीं किती मोठ्या प्रमाणावर होतो याची कांहीं कल्पना येईल. जर्मनीमध्यें हें पीक फारच मोठ्या प्रमाणावर होतें. जर्मनीच्या पश्चिम भागांत होणारें बटाट्याचें पीक बहुतेक सर्व खाण्याकरितां उपयोगांत आणलें जातें, व याकरितां करण्यांत येणारी बटाट्याची जातही वेगळी असते. पूर्व भागांत करण्यांत येणाऱ्या बटाट्याचें सर्व पीक औद्योगिक कामाकडे उपयोगांत आणलें जातें. अर्थात् ही जातहि खाण्याच्या बटाट्याच्या जातीहून वेगळी असते. वरील परिस्थिति दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वीची व जर्मनीची फाळणी होण्याच्या पूर्वीची होय, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

**बटाट्यापासून होणारे विविध पदार्थः**—बटाट्यामधील पिठूळ पदार्थांपासून शेवयासारखे पदार्थ, साबूचे दाणे वगैरे तयार करतात. बटाटे उकडून त्यांत पीठ मिसळून त्यापासून बटाट्याची ब्रेड म्हणजे, बटाटा पाव तयार करतात. बटाट्यामधील पाण्याचा भाग काढून बटाट्याच्या काचऱ्या तयार करतात व त्या


# बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

**—संचालक मंडळ—**

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

शाखा—(१) भवानी पेठ, पुणें. (२) सदाशिव पेठ, पुणें. (३) सोलापूर (४) सांगली.

व्याजाचे दर—चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

मुदत ठेवः—बँक १ ते ३ वर्षें मुदतीच्या ठेवी स्वीकारते. व्याजाबद्दल चौकशी करावी.

एक वर्षापेक्षा कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.
मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार, पुणें २.

गो. गं. साठे, मॅनेजर.

# दि सांगली बँक लिमिटेड

**सांगली**

(स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक)

**मुख्य ऑफिस : सांगली**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रुपये १०,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये ४,५०,००० |
| रिझर्व व फंडस् | रुपये ४,९०,००० |
| वर्किंग फंडस् | रुपये एक कोटीवर |

: शाखा :

मुंबई, शहापूर, तेरदळ, रबकवी, शिरहट्टी, मंगळवेढें, कवठें, कराड, उगार, विलिंग्डन कॉलेज, इचलकरंजी.

सांगली येथें सेफ् डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. आर. व्ही. देशमुख, B. A., B. Litt. (Oxon) (चेअरमन) कलेक्टर, साउथ सातारा.

(१) श्री. नेमचंद रावजी शहा (२) श्री. भूपालराव अनंत आरवाडे (३) श्री. पुरुषोत्तम गोकुळदास, (४) श्री. गुंडप्पा बाबाजी आरवाडे, (५) श्री. तात्यासाहेब श्रीमंधर आरवाडे, (६) श्री. मारुतीराव रामचंद्र जाधव.



एम्. के. गुत्ते,
एम्. ए., सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर

पुष्कळ दिवसपर्यंत उपयोगाकरितां एक महत्त्वाचें खाद्य म्हणून ठेवतात. या कच्च्या खाण्यानें योग्य ती उष्णता शरीरांत उत्पन्न होऊन काम करण्यास चांगली तकवाही येतो. पाश्चात्य देशांत बटाट्याचा उपयोग जनावरांच्या खाण्याकडेहि करतात. बटाटे शिजवून किंवा कित्येक वेळेस त्यांचे बारीक तुकडे करून घोड्यास देतात. १ पौंड बटाट्यास २½ पौंड इतर खुराक, हें प्रमाण असतें. पोषणाच्या दृष्टीनें १५ पौंड बटाट्यांपासून ४½ पौंड ओट धान्याइतका पोषक पदार्थ मिळतो. बटाटे दुभत्या जनावरास खुराक म्हणूनहि देतात. बटाटे साफ करून, धुवून, नंतर शिजवून, गवताचा बारीक भुगा करून त्याबरोबर देतात. जनावरास बटाटे तसेच देण्यापेक्षां उकडून देणें चांगलें असें समजलें जातें. मांसाकरितां पाळलेल्या डुकरांस बटाट्याचा खुराक चांगला मानवतो व तीं चांगली पोसून लठ्ठ होतात. बटाट्यावरील पापुद्र्यांत 'सोलेनिन' नांवाचें एक अपायकारक द्रव्य असतें. बटाटे शिजविले म्हणजे हें नाहींसें होतें. पापुद्रा काढलेले बटाटे गार पाण्यांत टाकूं नयेत कारण त्यामुळें त्यांतील अन्नांश कमी होतो. म्हणून बटाटे शिजविण्यापूर्वी ऊन पाण्यांतच टाकावेत व शिजवावे म्हणजे शिजल्यानंतर ते चिकट होत नाहींत. वर निदर्शित केल्याप्रमाणें, बटाट्यामध्यें ७५ टक्के पाणी असून २५ टक्के पोषक पदार्थ असतो. हा पोषक पदार्थ वरील पापुद्र्याखालीं असतो. करितां बटाट्याची साल काढतांना आंतील भाग सालीबरोबर कापला जाणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी लागते.

औद्योगिक उपयोगः—बटाटे शिजवून त्यापासून स्टार्च (चिकट पिठूळ पदार्थ) तयार होतो. याचा उपयोग निरनिराळ्या प्रकारानें करतात. धोबीखान्यामध्यें कपडे स्वच्छ करण्याच्या कामीं याचा उपयोग होतो. कापडाच्या व तागाच्या गिरण्यामध्यें याचा उपयोग खळीसारखा करतात. बटाट्याचा पिठूळ भाग शिजवून त्यापासून झालेल्या चिकट पदार्थाचा उपयोग कपडा ताठ व मलम करण्याकरितां व कागदाच्या गिरण्यामध्यें कागद सफाई होण्याकरिताही होतो. हा चिकट पदार्थ (गम) तिकिटें, लेबलें यांसही लावला असतां तो पाणी लावून चिकटवितां येतात.

याप्रमाणें खाद्य व औद्योगिक दृष्टीनें बटाट्याचें पीक फारच महत्त्वाचें आहे असें दिसून येईल.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर
पॉवरवर चालणारे

"शरद चरक"

वसंत नं. ३ चरक
उसाचे चरक
हंगाम नजीक आला!
—सविस्तर माहितीसाठी आजच लिहा.—
किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी (जि. द. सातारा)

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.
(शिड्यूल्ड बँक)
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,१९,४८५
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. वा. ग. खापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

## स्वतःचे कपडे स्वतःच शिवणाऱ्या अमेरिकन स्त्रिया

### शिवणकामाच्या शिक्षणाच्या विपुल सोयी

अमेरिकेंतील स्त्रीवर्गात घरगुती शिवणकामाची आवड वाढत आहे. सामाजिक समारंभांत स्त्रिया जे सुंदर व अद्ययावत पोषाख घालून येतात, त्यापैकी धंदेवाईक शिंप्यानें शिवलेला किंवा दुकानांत खरेदी केलेला कोणता व घरीं शिवलेला कोणता हें सांगणें पुष्कळदां कठीण असतें. "नॅशनल नीडलक्रॅफ्ट ब्युरो" या शिवणकामाच्या खाजगी संस्थेनें प्रसिद्ध केलेल्या माहितीवरून असें समजतें कीं, अमेरिकेंत सुमारें ५,२०,००,००० स्त्रिया व मुली आपापल्या घरांत शिवणकाम करीत असतात. त्यांपैकी निम्म्यापेक्षा अधिक स्त्रिया अशा आहेत कीं ज्या केवळ जुने कपडे दुरुस्त करतात एवढेंच नाहीं, तर नवीन कपडेहि तयार करतात. त्या स्वतःसाठी व मुलांसाठी कपडे शिवतात आणि खिडक्यांचे पडदे व घरांतील सामानाचे अभ्रे तयार करून घराची शोभा वाढवितात.

### कपड्यांचे तयार नमुने

कपड्यांचे नमुने बाजारांत तयार मिळतात आणि शिवणकामाचें शिक्षण मिळण्याच्या सोयी विपुल आहेत. त्यामुळें शहरांतील व खेड्यांतील स्त्रियांना घरीं शिवलेले आकर्षक कपडे वापरतां येतात. साधे टाके घालणाऱ्या यंत्रापासून चुण्या पाडणाऱ्या, झालर शिवणाऱ्या व भरतकाम करणाऱ्या यंत्रापर्यंत अनेक प्रकारचीं शिवणयंत्रें घरगुती शिवणकामासाठी वापरलीं जातात. बऱ्याच स्त्रियांना कपडे बेततां येतात, पण बहुसंख्य स्त्रिया बाजारांत मिळणाऱ्या तयार नमुन्यांचा उपयोग कपडे बेतण्यासाठी करतात. त्या नमुन्यांसाठी चिवट कागद वापरलेला असतो. सर्व आधुनिक तऱ्हांचे ते नमुने निरनिराळ्या लहानमोठ्या मापांचे असतात. त्यामुळें स्त्रियांना कपडे अंगाबरोबर बेतण्यासाठी फारसा त्रास घ्यावा लागत नाहीं. नमुन्यांबरोबर त्या त्या कपड्याच्या शिवणकामाच्या आकृत्या व तपशिलवार माहिती असते. शिवण किती रुंद ठेवावी, टाके कोठें सुरू करावेत, काप कोठें लावावेत, चुण्या कोठें घालाव्यात, कापडाची बचत कशी करावी, फितीबटनें वगैरे कशीं व कोठें लावावीत, काजे कसे करावेत, अशी सर्व माहिती त्या कागदी नमुन्याबरोबर मिळते.

ते नमुने व त्याबरोबरची माहिती इतकी स्पष्ट असते कीं नवशिक्या स्त्रीलाहि कपडे शिवणें कठीण वाटूं नये. पण घरीं कपडे शिवणाऱ्या बहुतेक स्त्रियांनीं शिवणकामाचें थोडें तरी शिक्षण घेतलेलें असतें. १९५२-५३ या शालेय वर्षी माध्यमिक शाळांतील १७,५०,००० मुलींनीं आणि कॉलेजांतील ७६,००० पेक्षा अधिक तरुणींनीं कौटुंबिक अर्थशास्त्राचे अभ्यासक्रम (ज्यांत शिवणकामाचा अंतर्भाव असतो) घेतले होते.

### शिवणकामाचे वर्ग

ज्यांना लहान वयांत शिवणकामाचें शिक्षण मिळूं शकलें नाहीं अशा स्त्रियांसाठी अगदीं अल्प खर्चात शिवण शिकण्याच्या सोयी आहेत. वॉशिंग्टनच्या सार्वजनिक शाळांच्या व्यवस्थेकडून प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविले जातात आणि तशाच प्रकारचे वर्ग अमेरिकेच्या प्रत्येक राज्यांत चालविले जात आहेत. त्या वर्गांत अनुभवी शिक्षकांच्या देखरेखीखालीं शिवणकामाच्या सर्व अंगांचें शिक्षण मिळतें.

शिवणकामाच्या वर्गांची एक मोठ्यांत मोठी योजना "सिंगर सोइंग मशीन कंपनी" नें चालविली आहे. त्या योजनेप्रमाणें सगळ्या अमेरिकेंत १,००० पेक्षा अधिक केंद्रें असून त्यांत दरसाल ४,००,००० पेक्षा अधिक स्त्रिया व मुली शिक्षण घेत असतात.


## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्ले, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | १,९०,००० |
| ठेवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९२,९३,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५२ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.
ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.
एच. एस. कुलकर्णी, मॅनेजर.



१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

## वे स्ट र्न इं डि या

विमा कंपनीनें आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा यासंबंधीची प्रचीति पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| हयातींतील पॉलिसी | हयातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.
मॅनेजर

## वेस्टर्न इंडिया लाईफ
## इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर-ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें-१

फोन नंबर— ३४०२

कंपनीकडून शिवणयंत्र विकत घेणाऱ्यांना त्या अभ्यासक्रमाची फी द्यावी लागत नाहीं आणि इतरांना अगदीं थोडी फी आकारली जाते. त्या वर्गांत अगदी प्राथमिक श्रेणीपासून तज्ज्ञाच्या श्रेणीपर्यंत शिवणकलेचें संपूर्ण शिक्षण दिलें जातें. दिवसा कामावर जाणाऱ्या स्त्रियांसाठी सायंकाळच्या वर्गांची सोय आहे.

शिवणयंत्रें तयार करणारे इतर कारखानदार, तयार कपड्यांचीं मोठमोठीं दुकानें, शिवणाचे नमुने विकणारे व्यापारी, कापड कारखाने आणि "यंग वुमेन्स ख्रिश्चन असोसिएशन" सारख्या सामाजिक संस्था, यांचेंहि शिवणकामाच्या शिक्षणाचे वर्ग आहेत. त्याशिवाय वृत्तपत्रांत व मासिकांत शिवणकलेविषयीं वारंवार लेख प्रसिद्ध होत असतात.

### घरगुती प्रात्यक्षिकांचे एजंट

खेड्यांतील स्त्रियांना शिवणकामांत मार्गदर्शन करण्यासाठी "घरगुती प्रात्यांक्षिकांच्या एजंटां" चा फार उपयोग होतो. अमेरिकन सरकारच्या शेती–खात्याच्या सुमारें ४,००० एजंटांनीं ३३,००,००० पेक्षा अधिक शेतकरी कुटुंबांना घरगुती प्रश्नांत मदत केलेली आहे. त्या एजंटांच्या मदतीचा उपयोग राष्ट्रीय, राज्य व स्थानिक सरकारें सहकार्यानें करून घेत असतात. इतर अनेक घरगुती बाबींप्रमाणें शिवणकामाच्या बाबतींतहि खेड्यांतील स्त्रियांना त्या एजंटांकडून मार्गदर्शन मिळतें. शेती–खात्याकडून प्रकाशित होणाऱ्या कित्येक पुस्तिकांत घरगुती शिवणकामाविषयीं माहिती दिलेली असते.

राज्य व मध्यवर्ती सरकारें नभोवाणीच्या व दूरदर्शनाच्या (टेलीव्हिजन) कार्यक्रमांतूनहि शिवणकामाची माहिती देत असतात.

---

### प. खा. गव्हर्मेंट सर्व्हंटस को. बँक लि., धुळें

सभासदांची संख्या ११८३, भागभांडवल ५७,०५० रु., वर्गणी ४,४८,९३८ रु., येणें कर्ज १,९४,२७० रु., से. बँक खातें २,०२,९३२ रु., खेळतें भांडवल ८,०४,२२४ रु., नफा ६८७९ रु. असे अहवालांतील प्रमुख आकडे आहेत. ६¼% डिव्हिडंड देण्यांत येईल. बँकेनें ४,६२,७१८ रु. सरकारी व निमसरकारी रोख्यांत गुंतविलेले आहेत. बँकेच्या कापड दुकानाचा व्यवहार बंद केला, तरी त्यामुळें त्या कामासाठी बँकेनें दिलेल्या भांडवलास धोका पोंचलेला नाहीं. श्री. शि. मो. सोनार ह्यांच्या विमा–योजनेचा विचार चालू आहे. (चेअरमनः या. सु. भावसार. सेक्रेटरीः रा. बा. रत्नपारखे वा. सभाः २७–९–५३).

---

### श्री लक्ष्मी को. बँक लि, सोलापूर

वरील बँकेच्या उत्पन्नांत व निवळ नफ्यांत वरचेवर वाढ होत आहे. अहवालाचे वर्षीं बँकेला ३,१३,२५० खेळत्या भांडवलावर ४,०५७ रु. नफा झाला. बँकेचें वसूल भांडवल ४२,९०० रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ३०,१८८ रु. चे आहेत. बँकेची रिकरिंग ठेवखातें पद्धत बरीच लोकप्रिय होत आहे. थकबाकी कमी झाली आहे. बँकेचें कमिशनचें उत्पन्न वाढत आहे. बँकेच्या दुकानास मंदीच्या परिस्थितींतहि थोडा नफाच झाला आहे. डिव्हिडंड ६¼% मिळणार आहे. ६ जून, १९५४ रोजीं बँकेस २५ वर्षें पुरीं होतात. त्या ज्युबिलीनिमित्त इमारत बांधण्याची योजना बोर्डानें आखली आहे. (प्रेसिडेंट : कृ. ना. पंडित. ऑ. मॅ. डायरेक्टर : ना. सि. बाचा. मॅनेजर ना. धों. ढंके. वा. सभा : १–९–५३)


'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

—: महाराष्ट्राची अग्रेसर कंपनी :—

दि सेन्ट्रल म्युच्युअल लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि.

पहिल्याच मूल्यमापनांत बोनस जाहीर करून, कंपनीनें असाधारण विक्रम करून दाखविला आहे. दुसऱ्या मूल्यमापनाचें काम चालू झालें असून, त्यांत निश्चित प्रगति दिसेल अशी खात्री वाटते.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

दि युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७१ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला (चेअरमन)

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका<br>व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या<br>व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सींच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.